महाराष्ट्र राज्य वेटलँड प्राधिकरण गठीत करणेबाबत...

**महाराष्ट्र शासन**
**पर्यावरण विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण २०१७/प्र.क्र. ४६/तां.क.३**
१५ वा मजला, नवीन प्रशासन भवन,
मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक: ६ फेब्रुवारी, २०१८.

**वाचा :-** १) केंद्रीय वने व पर्यावरण मंत्रालयाचे जीएसआर-१२०३ (ई) दि.२६.९.२०१७ च्या अधिसूचने अन्वये वेटलँड (संवर्धन व व्यवस्थापन) नियम, २०१७

**प्रस्तावना:-**

केंद्रीय वने व पर्यावरण मंत्रालयाने जीएसआर-१२०३ (ई) दि.२६.९.२०१७ च्या अधिसूचने अन्वये वेटलँड (संवर्धन व व्यवस्थापन) नियम, २०१७ प्रकाशित केले आहेत. या अधिसूचनेतील तरतूदीच्या अंमलबजावणीसाठी नियम ५ मध्ये दिलेल्या संरचनेनुसार राज्य शासन स्तरावर महाराष्ट्र राज्य वेटलँड प्राधिकरण गठीत करणे अपेक्षित आहे. तसेच नियम ५ (६) अन्वये या प्राधिकरणाला सहाय्य करण्यासाठी तांत्रिक समिती व ४ सदस्यीय तक्रार निवारण समिती गठीत करणे आवश्यक आहे. त्यानुसार महाराष्ट्र राज्य वेटलँड प्राधिकरणाचे व त्याअंतर्गत समित्यांचे गठन खालीलप्रमाणे करणे विचाराधिन होते.

**शासन निर्णय :-** महाराष्ट्र राज्य वेटलँड प्राधिकरणाचे व त्याअंतर्गत समित्यांचे गठन खालीलप्रमाणे प्रस्तावित करण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | मा.मंत्री, पर्यावरण विभाग | अध्यक्ष |
| २. | अतिरिक्त मुख्य सचिव, पर्यावरण विभाग. | उपाध्यक्ष |
| ३. | सचिव, वने विभाग | सदस्य |
| ४. | सचिव, नगर विकास विभाग | सदस्य |
| ५. | सचिव, ग्राम विकास विभाग | सदस्य |
| ६. | सचिव, जलसंपदा विभाग | सदस्य |
| ७. | सचिव, पदुम विभाग | सदस्य |
| ८. | सचिव, मदत व पुनर्वसन विभाग | सदस्य |
| ९. | सचिव, पर्यटन विभाग | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| १० | सचिव, महसूल विभाग | सदस्य |
| ११ | सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ | सदस्य |
| १२ | अतिरिक्त प्रधान मुख्य वनसंरक्षक, केंद्रीय वन व पर्यावरण मंत्रालय, विभागीय कार्यालय, नागपूर | सदस्य |
| १३ | चीफ वाईल्ड लाईफ वार्डन | सदस्य |
| १४ | सदस्य सचिव, राज्य जैव विविधता मंडळ | सदस्य |
| १५ | संचालक, महाराष्ट्र रिमोट सेंन्सींग सेंटर | सदस्य |
| १६ | डॉ. हिमांशू कुलकर्णी, शास्त्रज्ञ, ॲक्वाडॅम, पुणे. | तज्ञ सदस्य (मत्स्य व जलसंपदा) |
| १७ | डॉ. भारत भूषण, विभाग प्रमुख, पर्यावरण, यशदा, पुणे. | तज्ञ सदस्य (वेटलँड इकॉलॉजी/ लँडस्कॅप प्लानींग) |
| १८ | प्रो.डॉ. क्रीष्णन नारायणन, विभाग प्रमुख, मानवता व समाज शास्त्र, आयआयटी, मुंबई. | तज्ञ सदस्य (सामाजिक व आर्थिक) |
| १९ | संचालक/ प्रतिनिधी, सेंट्रल इन्स्टिटयूट ऑफ फिशरीज एज्युकेशन, वर्सोवा, मुंबई. | तज्ञ सदस्य (फिशरीज/ इकॉलॉजी) |
| २० | डॉ. रितेश कुमार, वेटलँड इंटरनॅशनल, साऊथ एशिया | तज्ञ सदस्य (वेटलँड) |
| २१ | संचालक, पर्यावरण विभाग, मंत्रालय | सदस्य सचिव |

२. या समितीची कार्यकक्षा वेटलँड (संवर्धन व व्यवस्थापन) नियम, २०१७ मधील नियम ५ (४) मध्ये विहीत केल्याप्रमाणे असतील. सदर प्राधिकरण वर्षातून कमीत कमी ३ वेळा बैठका घेईल. तसेच तज्ञ सदस्यांचा समितीवरील कार्यकाळ ३ वर्षांपेक्षा जास्त नसेल.

३. वेटलँड अधिसूचनेतील नियम ५ (६) (अ) नुसार या प्राधिकरणास तांत्रिक सहाय्य करण्यासाठी, ब्रिफ डॉक्युमेंटसचा आढावा घेणे, प्रारुप व्यवस्थापन आराखडे तयार करणे व प्राधिकरणाने शिफारस

केलेल्या बाबींवर तांत्रिक सल्ला देणे इ. कामांसाठी खालीलप्रमाणे तांत्रिक समिती गठीत करण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | शास्त्रज्ञ श्रेणी-१, पर्यावरण विभाग, मंत्रालय | समिती प्रमुख |
| २. | सह संचालक, जलप्रदूषण निवारण, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ | सदस्य |
| ३. | सहाय्यक सिस्टम अधिकारी (माहिती तंत्रज्ञान), महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ | सदस्य |
| ४. | श्रीमती निलीमा श्रीवास्तव, शास्त्रज्ञ, एमआरसॅक, नागपूर | सदस्य |
| ५. | डॉ.हिमांशू कुलकर्णी, शास्त्रज्ञ, ॲक्वाडॅम, पुणे | सदस्य |
| ६. | श्री.द.सू.भालेराव, शास्त्रज्ञ-२, पर्यावरण विभाग, मंत्रालय | सदस्य सचिव |
| ७. | क्षेत्रीय अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ. | समन्वयक |

समिती प्रमुख आवश्यकतेनुसार बैठकीसाठी प्राधिकरणातील इतर तज्ञ सदस्यांना आमंत्रित करु शकतील. ही समीती वेटलँड अधिसूचनेतील नियम ५ (६) (अ) नुसार वेटलँड प्राधिकरणास सहाय्य करेल.

४. वेटलँड अधिसूचनेतील नियम ५ (६) (अ) नुसार ४ सदस्यीय तक्रार निवारण समिती खालीलप्रमाणे गठीत करण्यात येते आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | उप सचिव (आस्थापना), पर्यावरण विभाग, मंत्रालय | समिती प्रमुख |
| २. | प्रादेशिक अधिकारी, मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ | सदस्य |
| ३. | विधी अधिकारी, पर्यावरण विभाग / महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ | सदस्य |
| ४. | श्री.जॉय ठाकूर, शास्त्रज्ञ-२, पर्यावरण विभाग, मंत्रालय | सदस्य सचिव |
| ५. | क्षेत्रीय अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ. | समन्वयक |

वरील दोन्ही समित्या प्रत्येक तिमाहीत कमीत कमी एकदा तरी बैठक घेतील व त्याचा अहवाल प्राधिकरणास सादर करतील.

५. या प्राधिकरणाच्या व त्या अंतर्गत गठीत समित्यांच्या दैनंदिन कामकाजासाठी तसेच वेटलँड नियम, २०१७ प्रमाणे वेटलँड आयडेंटीफिकेशनच्या बाबतीतील कामासाठी सेक्रेटरिएट म्हणून महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ कार्य करेल. तसेच प्राधिकरण / समित्या इ.च्या बैठका, कार्यालयीन खर्च, बैठकीवरील खर्च , तज्ञ सदस्य, सदस्य सचिव यांचेसाठी वाहन, वाहन चालक, वाहनासाठी इंधन व अनुषंगिक खर्च, तज्ञ सदस्य, सदस्य व सदस्य सचिव यांच्या स्थळ पाहणी च्या अनुषंगाने झालेला खर्च इ. राज्य पर्यावरण आघात मुल्यांकन प्राधिकरणाच्या बचत खात्यात जमा निधीतून करण्यात यावा.

६. प्राधिकरण व त्याअंतर्गत गठत समित्यांच्या नियमित कामकाजाच्या सहाय्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळातून ३ क्षेत्रिय अधिकारी वा तत्सम अधिकारी उधार सेवेने प्राधिकरणाच्या कामासाठी उपलब्ध करुन घेण्यात येतील. तसेच ३ डाटा ऑपरेटर, ३ लघुलेखक, ३ लिपिक व २ प्रकल्प अधिकारी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून कंत्राटी तत्वावर प्राधिकरणासाठी उपलब्ध करुन देण्यात यावेत. यावरील खर्च परिच्छेद ५ मध्ये नमूद केल्यानुसार राज्य पर्यावरण आघात मुल्यांकन प्राधिकरणाच्या बचत खात्यात जमा निधीतून करण्यात यावा, असे प्रस्तावित करण्यात येत आहे.

७. प्राधिकरणात व समित्यांमधील तज्ञ सदस्यांना बैठक भत्ता / मानधन प्रत्येक दिवसासाठी केंद्र शासनाच्या नियमाप्रमाणे रु.३,०००/- प्रतिदिन, इकॉनॉमी वर्ग विमान प्रवास, द्वितीय श्रेणी रेल्वे प्रवास, स्थानिक प्रत्यक्ष झालेला प्रवास खर्च, प्रत्यक्ष वास्तव्यासाठीचा खर्च इ. अनुज्ञेय असेल तसेच तज्ञ सदस्य, सदस्य व सदस्य सचिव यांच्या क्षेत्र भेटी दरम्यान मानधन प्रत्येक दिवसासाठी केंद्र शासनाच्या नियमाप्रमाणे रु.३,०००/- प्रति दिन, इकॉनॉमि वर्ग विमान प्रवास, द्वितीय श्रेणी रेल्वे प्रवास, स्थानिक प्रत्यक्ष झालेला प्रवास खर्च इ. अनुज्ञेय असेल. स्थळ पाहणीदरम्यान राहण्यासाठी झालेला प्रत्यक्ष खर्चही अनुज्ञेय असेल.

८. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०१८०२०६१६३३०४९९०४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Satish Madhukar Gavai

Digitally signed by Satish Madhukar Gavai
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Environment Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=93a21ab61652bcb969c94ac6135ec0dc9c2ab5609eb954d3de55100604ad4386, serialNumber=b32b48825a7f1e378cf9c45a746344cd98a33fcf7ce566dd8f527acfa94563c1, cn=Satish Madhukar Gavai
Date: 2018.02.06 16:36:55 +05'30'

**(सतिश गवई),**
**अ.मु.स. (पर्यावरण)**

**प्रति,**

१. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
२. मा. मंत्री व राज्यमंत्री, पर्यावरण यांचे खाजगी सचिव
३. मा. मुख्य सचिव
४. सचिव, नगर विकास विभाग
५. सचिव, ग्राम विकास विभाग
६. सचिव, जलसंपदा विभाग
७. सचिव, पर्यटन विभाग
८. सचिव, पदुम विभाग
९. सचिव, मदत व पूनर्वसन विभाग
१०.सचिव (वने), महसूल व वने विभाग
११.वेटलँड प्राधिकरण व समितीचे सर्व सदस्य.
१२.सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ
१३.सर्व विभागीय आयुक्त
१४.सर्व जिल्हाधिकारी
१५.सर्व महानगरपालिका आयुक्त
१६.सर्व मुख्यकार्यकारी अधिकारी जिल्हापरिषद
१७.सर्व मंत्रालयीन विभाग
१८. सर्व मुख्यधिकारी, नगरपालिका
१९.महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय (प्रसिध्दीसाठी)
२०.संचालक, मुंबई दूरदर्शन (प्रसिध्दीसाठी).